MHAH220001782026

फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४३/२०२६ मधील नि.क्र.१ खालील आदेश

[दिनांक ०९.०३.२०२६]

भाऊसाहेब आश्राजी राऊत वि. सरकार

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार भाऊसाहेब आश्राजी राऊत याने भारतीय नागरीक सुरक्षा कायदा २०२३ चे कलम ५०३ अन्वये जप्त वाहनाचा अंतरिम ताबा मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार रा.मु. वाळुंज, पो. जोगेश्वरी पारगाव, ता. आष्टी, जि. बीड येथील रहिवासी असून तो शेती व परीसरातील इतर शेतींचे व्यवसाय, डेव्हलपिंग, बांध बंदिस्ती करतो. त्यासाठी त्यांनी जॉनडियर कंपनीचा ट्रॅक्टर त्यांनी दि.२६/०९/२०२२ रोजी हरिनाथ ट्रॅक्टर मिरजगाव, ता. कर्जत यांच्याकडून विकत घेतलेला असून त्यासोबत एक चारचाकी हिरव्या रंगाची ट्रॉली असून सदर ट्रॅक्टर व ट्रॉलीचा उपयोग अर्जदार हा वैयक्तीक शेतीची तसेच इतर बाहेरील भाडे तत्वावरील कामासाठी करीत असून सदर ट्रॅक्टरचा चॅसीस नंबर 1VY5310EPNA021513, इंजिन नंबर PY3029H810852 व एक चारचाकी हिरव्या रंगाची ट्रॉली. अर्जदाराचे मालकीचे सदर वाहन पोलीस स्टेशन, मिरजगाव येथे गु.र.नं.१८/२०२६ चे भारतीय न्याय संहिता चे कलम ३०३(२) व पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ चे कलम ३/१५ अन्वये गुन्हयाच्या कामी जप्त करण्यात आलेले आहे. सदरकामी मिरजगाव पोलिस स्टेशनचे अधिकारी यांनी सदरचे वाहन जप्त करुन मिरजगाव पोलिस स्टेशन येथे ठेवलेले आहे. सदर वाहन पो.ठाण्यात पडून राहिल्यास त्याचे पार्ट खराब होणार आहेत. सदर वाहन वापरात न राहिल्यास त्यामध्ये बिघाड होणार आहे. सदर वाहन हे दैनंदिन वापरासाठी गरजेचे असून न्यायालय सांगेल त्या अटी व शर्तीचे पालन करण्यास तो तयार आहे. सबब सदरील वाहनाचा अंतरिम ताबा मिळण्यासाठी त्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. तपासी अधिकारी यांनी म्हणणे नि.क्र.६ लगत दाखल करुन सदर जप्त वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदारास देण्यास हरकत घेतली आहे. तपासी अधिकारी यांचे कथनानुसार मा. तहसिलदार साहेब, कर्जत यांना सदर वाहनावर दंडात्मक कारवाई करणेबाबत पत्र व्यवहार करण्यात आलेला असून कारवाई चालु असल्याने कारवाई पुर्ण होईपावेतो सदर वाहन अर्जदाराच्या ताब्यात देण्यात येऊ नये. सदर अर्जदाराने अर्ज केलेल्या गुन्हयातील जप्त वाहन हे मुळ कोणाच्या मालकीचे आहे याबाबत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडुन माहिती प्राप्त करुन घेणे आवश्यक असल्याने सदर वाहन अर्जदाराच्या ताब्यात देण्यात येऊ नये. अर्जदाराने गुन्हयात जप्त वाहनाबाबत अद्याप पावेतो कोणतेही कागदपत्र सादर केलेले नसून सदर वाहन अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास तो यापुढे तपासास सहकार्य करणार नाही. अर्जदाराच्या ताब्यात सदर वाहन दिल्यास तो त्याची विक्री करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर वाहन अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास त्याचे मुळ स्वरुपात बदल करुन त्यास रंगरंगोटी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर वाहनाचा वापर अशाच प्रकारचे गुन्हे करण्याची शक्यता असून सदर वाहन तो मा. कोर्टात पाहिजे त्यावेळेस हजर करेल याची शक्यता नाही. सबब, अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. तपासी अधिकारी यांनी म्हणणे नि.क्र.७ लगत दाखल करुन सदर जप्त वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदारास देण्यास हरकत घेतली आहे. तपासी अधिकारी यांचे कथनानुसार सदर गुन्हयाचे तपासकामी एक जॉनडिअर कंपनीचा ५३१० मॉडेलचा ट्रॅक्टर त्याचा चेसी. नं. 1VY5310EPNA021561 व इंजिन नंबर PY3029H180922 व त्याच्या पाठीमागे एक हिरव्या रंगाची चारचाकी ट्रॉली त्यामध्ये अंदाजे एक ब्रास वाळू, प्रती ब्रास र.रु. १०,०००/- प्रमाणे मिळुन आल्याने तो ताब्यात घेण्यात आला होता. सदर ट्रॅक्टर व ट्रॉली यांचे मुळ कागदपत्र हजर करणेबाबत वेळोवेळी आरोपीस कळविले असता त्याने आज पावेतो सदर वाहनाचे कोणत्याही प्रकारचे मुळ कागदपत्र साद केले नाही. तसेच सदर अर्जदाराने मा.

न्यायालयात वाहन सोडण्याबाबत दिलेल्या अर्जात चुकीचा इंजिन व चेसी नंबर दिला असून जप्त केलेल्या ट्रॅक्टर व ट्रॉली यांचे चेसी नंबर व इंजिन नंबर हे जप्त केलेल्या वर्णनानुसार आहेत. सबब, सदर अर्जाबाबत योग्य तो आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

५. प्रथम खबरी अहवालात नमुद केलेले जप्त वाहनाचे वर्णन आणि प्रस्तुत अर्जात दिलेले वर्णन यामध्ये तफावत निदर्शनास आल्याने जप्त केलेले वाहन व प्रस्तुत अर्जात वर्णन केलेले वाहन एकच आहे किंवा भिन्न याबाबत तपासी अधिकाऱ्यांनी खुलासा द्यावा असा आदेश नि.क्र.०१ लगत करण्यात आला. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी नि.क्र.७ लगत म्हणणे दाखल केले. त्यांच्या कथनानुसार प्रथम खबरी अहवालातील जप्त वाहनाचे वर्णन हे प्रत्यक्ष जप्त केलेल्या वाहनाच्या वर्णनाप्रमाणे नमुद आहेत. अर्जदाराने सदर अर्जात सदर वाहनाचा चुकीचा चेसीस व इंजिन नंबर नमुद केलेला आहे.

६. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल की, सदर वाहनावर दंडात्मक कारवाई करणेकरीता तहसीलदार साहेब, कर्जत यांना पत्र व्यवहार केलेला असून कारवाई चालु असल्याने वाहन सोडण्यात येऊ नये. तसेच संपरिक्षेवेळी महत्वाचा पुरावा मे. कोर्टासमोर उपलब्ध असणार नाही. सदर वाहन अर्जदारास परत केल्यास अशाच प्रकारच्या गुन्हयात त्याचा वापर करु शकतो. तसेच सदर वाहनाच्या बाह्य स्वरुपात बदल करु शकतो. तसेच वैध इन्शुरंसबाबत कोणतेही कागदपत्र सोबत जोडलेले नाही. सबब, सदर अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी हरकत घेतलेली आहे.

७. अर्जदाराने त्याच्या कथनांच्या पृष्ठ्यर्थ स्वतःचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.५, गु.र.नं.१८/२०२६ ची एफ.आय.आर. ची छायांकित प्रत (नि.क्र.३/१), ट्रॅक्टरची

कर बीजक पावतीची पडताळणी प्रत (नि.क्र.३/२) व अर्जदाराचे स्वतःचे आधारकार्डची पडताळणी प्रत (नि.क्र.३/३) ही कागदपत्रे दाखल केली आहेत.

८. उपरोक्त गुन्ह्यात पोलीसांनी ट्रॅक्टर व ट्रॉली जप्त केलेले आहेत ही बाब विवादीत नाही. अर्जदाराच्या कथनानुसार तो जप्त वाहनाचा मालक आहे. सदर कथनाचे पुष्ठ्यर्थ त्याने सदर गुन्ह्यातील वाहनाचे कर बीजक पावतीची पडताळणी प्रत दाखल केलेली आहे. त्यात नमूद वाहनाचे वर्णन अर्जदाराने अर्जात नमुद केलेल्या वाहनाच्या वर्णनाप्रमाणे आहे. सदर अर्जात नमुद जप्त वाहनाचा चॅसीस नंबर 1VY5310EPNA021513, इंजिन नंबर PY3029H810852 असा असून छापील प्रथम खबरी अहवालातील वाहनाचा नमुद चेसी. नं. 1VY5310EPNA021561 व इंजिन नंबर PY3029H180922 असा असून दोन्हीमध्ये तफावत आहे. अर्जदाराच्या वतीने सदर वाहनाच्या वर्णनातील तफावतीबाबत कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. त्यामुळे सकृतदर्शनी अर्जात नमुद केलेले वाहन व पोलीसांनी प्रत्यक्षात जप्त केलेले वाहन हे एकच आहे हे अर्जदार शाबीत करु शकलेला नाही. अशा परिस्थितीत वाहनाच्या ओळखी शिवाय सकृतदर्शनी अर्जदार हा पोलीसांनी जप्त केलेल्या वाहनाचा मालक आहे असा निष्कर्ष काढता येणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

अर्जदाराचा प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

SHIVAJI N THAPEKAR
Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR
Date: 2026.03.09 10:09:30 +0530

कर्जत. (एस.एन.थापेकर)

ता.०९/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (कोर्ट क्र.१),कर्जत.

प्रमाणपत्र

प्रमाणीत करण्यात येते की, या पी.डी.एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ न्यायनिर्णयाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

न्यायालयाचे नाव	:	**श्री. एस. एन. थापेकर** न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.१, कर्जत, जि.अहमदनगर.
लघुलेखकाचे नाव	:	**वैभव गो. घोगरे** लघुलेखक (श्रेणी–३).
न्यायनिर्णय दिनांक	:	०९/०३/२०२६